दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : २१२
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, शुक्रवार, दि.१४ मार्च २०२५





तुम्हाला व तुमच्या परिवारास धूलिवंदनाच्या हार्दिक शुभेच्छा !





## कुंभमेळ्यात नाशिक, त्र्यंबकेश्वरचा प्रवास सुखद होणार!

## महामार्ग विस्तारीकरण, रस्ता मजबुतीकरणासाठी २२७० कोटी

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१३, नाशिक :** आगामी सिंहस्थ कुंभमेळ्यात कोणत्याही भागातून रस्ते मार्गाने नाशिक-त्र्यंबकेश्वरमध्ये दाखल होणाऱ्या भाविकांना सुखद व जलद प्रवासाची अनुभूती देण्याची तयारी प्रशासनाने चालविली आहे. त्याकरिता नाशिक-त्र्यंबकेश्वर मार्गाचे सहापदरीकरण, कॉक्रीटीकरण, नाशिक-दिंडोरी-वणी रस्त्यासह अन्य राज्य मार्गांचे मजबुतीकरण, वाहतूक कोंडी टाळण्यासाठी शहराच्या सभोवताली वर्तुळाकार रस्त्याचे जाळे विणले जाणार आहे. या कामांसाठी तब्बल २२७० कोटींची आर्थिक तजविज राज्याच्या अर्थसंकल्पात करण्यात आली आहे.

प्रयागराज कुंभमेळ्यात कोट्यवधी भाविकांनी सहभाग नोंदविला होता. २०२७ मध्ये नाशिक-त्र्यंबकेश्वर येथील कुंभमेळ्यातही भाविक उत्स्फुर्तपणे सहभागी होतील, हे गृहीत धरून नियोजनात व्यापक फेरबदल केले जात आहे. तयारीला कालावधी कमी असल्याने दीड ते दोन वर्ष लागणारी कामे तातडीने सुरू करण्याचे नियोजन करण्यात आल्याचे विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांनी म्हटले आहे. रस्ते, पूल, घाट व तत्सम कामांना जास्त वेळ लागतो.

राज्याच्या अर्थसंकल्पात नाशिक जिल्ह्यातील रस्त्यांच्या विविध कामांना मान्यता देऊन निधीची तरतूद करण्यात आली. सार्वजनिक बांधकाम विभागाने ७५९.२५ किलोमीटर रस्ते व पुलांची ५२ कामे प्रस्तावित केलेली आहेत. त्यास तीन हजार ५० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. यातील महत्वाची बरिच कामे अर्थसंकल्पात समाविष्ट झाल्याचे सांगितले जाते. या व्यतिरिक्त महापालिकेने शहरात साडेतेरा किलोमिटरचे १७ नवीन रस्ते प्रस्तावित केले असून १८८ किलोमीटर जुन्या रस्त्यांच्या सुधारणांचे नियोजन केले आहे. विविध रस्त्यांचा अंतर्भाव

त्र्यंबकेश्वर-नाशिक या ३० किलोमीटर मार्गाचे सहापदरीकरण व कॉक्रिटीकरणास (३५० कोटी) मान्यता मिळाली आहे. यात पालखी मार्गाचाही समावेश आहे. दिंडोरी-वणी-नांदुरी रस्ता रुंदीकरण (१०० कोटी), जानोरी अर्थात नाशिक विमानतळ ते राष्ट्रीय महामार्ग (५० कोटी), पेठ-हरसूल-त्र्यंबकेश्वर-पहिने (२०५ कोटी), त्र्यंबकेश्वर-धोंडेगाव-उमराळे-दिंडोरी-पालखेड-पिंपळगाव (२१५ कोटी) यांच्यासह अन्य वेगवेगळ्या ९१ किलोमीटरच्या रस्त्यांचे मजबुतीकरण करण्यात येणार आहे. यातील बहुतेक रस्ते वर्तुळाकार मार्गाचा भाग आहे. वेगवेगळ्या भागातून रस्ते मार्गाने येणाऱ्या भाविकांना ये-जा करणे सुकर होईल. शिवाय, महामार्गावरून मार्गस्थ होणाऱ्या वाहनांना शहरात येण्याची गरज भासणार नाही, असे नियोजन करण्यात आले आहे.

## महाराष्ट्रातील पहिलेच छत्रपती शिवाजी महाराज मंदीर लोकार्पणास सज्ज

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.१३, भिवंडी (ठाणे) :** शिवक्रांती प्रतिष्ठानच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराज यांचे महाराष्ट्रातील पहिले भव्यदिव्य मंदिर उभारले गेले आहे. भिवंडी वाडा रस्त्यावरील मराडे पाडा या ठिकाणी उभारलेल्या या मंदिराचे काम पूर्ण झाले आहे. आता तिथीनुसार शिवजयंती १७ मार्च रोजी येत आहे. या दिनी या मंदिराचे लोकार्पण करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये मंदिराचे लोकार्पण होणार आहे. या मंदिरातील शिवाजी महाराजांची मूर्ती अयोध्या येथील रामलल्लाची मूर्ती घडविणारे मूर्तीकार अरुण योगी यांनी बनवली आहे.



शिवाजी महाराजांची मूर्ती सहा फूट अखंड कृष्णशीला पाषाणातून घडविण्यात आली आहे. मंदिर परिसरात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवन चरित्रावर शिल्प चित्र साकारण्यात आले आहे. त्याखाली त्या प्रसंगाची माहिती मराठी, हिंदी, इंग्रजी भाषेमध्ये देण्यात आली आहे. हे मंदिर शिवप्रेमींसाठी तीर्थस्थळ बनणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार, छत्रपती शिवाजी महाराजांचे वंशज खासदार उदयनराजे भोसले, मंत्री शिवेंद्रराजे भोसले, स्वामी गोविंदगिरी महाराज, काडसिद्धेश्वर महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत या मंदिराचा भव्यदिव्य लोकपर्ण सोहळा पार पडणार आहे. सात वर्षे सुरू असलेल्या काम पूर्णत्वास आले आहे.येथील सर्व वातावरण शिवमय झाले आहे. संपूर्ण तालुका व जिल्ह्यात या मंदिराची चर्चा सुरू झाली आहे. संपूर्ण महाराष्ट्रातून या मंदिराबाबत विचारणा होत आहे. शिवाजी राजांमुळे आपल्या हिंदूंची मंदिर वाचली त्या राजांचे एक मंदिर व्हावे अशी आमची भावना होती. ज्या राजांमुळे आपला शमीन हिंदुस्थान अखंड राहिला. आदिलशहा निजाम शहा यांची आक्रमणे होत असताना आपले राजे त्यांच्या विरोधात उभे ठाकले ते लढले नसते तर आज परिस्थिती वेगळी असती. त्यामुळे आम्ही हे मंदिर उभारले आहे, असे शिवक्रांती प्रतिष्ठानचे संस्थापक राजूभाऊ चौधरी यांनी सांगितले. दरम्यान या अभूतपूर्व अशा मंदिरातील छत्रपती शिवाजी महाराज यांची मूर्ती ही अयोध्या येथील राम मंदिरातील रामलल्लांची मूर्ती साकारणाऱ्या अरुण योगीराज या आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या मुर्तीकाराने घडवली असून ती अखंड कृष्णशीला या दगडातून सहा फूट उंचीची बनवली आहे. अरुण योगीराज यांनी घडवलेली ही छत्रपती शिवाजी महाराज यांची ही पहिलीच मूर्ती आहे.त्यांनी चार वर्षांपूर्वी ती बनण्यास सुरुवात केली होती. मध्यंतरी रामलल्ला यांच्या मूर्तीच्या कामामुळे त्यामध्ये खंड पडला होता. ही मूर्ती बनवताना अरुण योगीराज यांनी विविध पैलूंचा अभ्यास करून या मूर्तीला जिवंत केले आहे. शिवाजी महाराजांच्या जीवनावरील शौर्याचे प्रसंग त्यांचा इतिहास समाजाला कळावा यासाठी तटबंदी खालील जागेत ३६ शिल्पचित्र बनवण्यात आले आहेत. त्याची माहिती मराठी इंग्रजी भाषेमध्ये दिली आहे.

## बारडच्या उपसरपंचाचा पुन्हा राजीनामा! राजकीय नाट्य 'राज' रंगले

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.१३, मुदखेड (नांदेड) :** जिल्ह्यात मोठी समजली जाणाऱ्या ग्रामपंचायतच्या उपसरपंच पदाचे राजकीय नाट्य'राज' संपुष्टात आले असून अखेर राजीनामा मंजूर झाल्याने शेवटच्या काही महिन्यांपूरता कार्यकाळासाठी नाईट वॉचमन म्हणून उपसरपंचपदी कुणाची वर्णी लागणार याची चर्चा असताना यासाठी अनेकजण इच्छुक असल्याने नाराजी नाट्यही पहावयास मिळू शकते.

स्थानिक स्वराज्य व ग्राम पंचायत निवडणूका डोळ्यासमोर ठेवून उपसरपंच बाळासाहेब देशमुख यांनी उपसरपंचपदाचा लागोलग दुसऱ्यांदा राजीनामा दिल्याने राजकीय नाट्य'राज' रंगले असून नागरिक अचंबित आहेत. सदरील राजीनामा आज जरी मंजूर झाला असला तरी या पूर्वीच्या राजीनाम्यावर पडदा का पडला हे अजूनही गुलदस्त्यात आहे. या पदासाठी आता जुन्या फळीतील अनेक वेळा सदस्य असलेले ग्राम पंचायत सदस्य विलासराव देशमुख, माणिकराव लोमटे, तसेच महिला वर्गातून इंदूबाई भिमेवार आणि नंदा किशन देशमुख यांच्या नावाची चर्चा आहे. परंतू गावचे रिमोट कंट्रोल हातात राहावे या उद्देशाने जेष्ठांना डावळले जाण्याची शक्यताही नाकारता येत नाही.

**राजकीय नाट्याचा परिणाम काय होणार ?**

बारडच्या उपसरपंचपदा करिता इंदूबाई भिमेवार, विलासराव देशमुख आणि माणिकराव लोमटे हे तीन प्रमुख दावेदार आहेत. यांपैकी कुणाचीही वर्णी न लागल्यास भविष्यात मोठे राजकीय पडसाद पडू शकतात अशी शक्यता नाकारता येत नाही! यामुळे 'करायला जावे गणपती आणि होऊ नये मारोती' अशीच चर्चा गावात रंगली आहे.



बारड ग्रामपंचायत अंतर्गत जवळपास साडेतीन हजार ओबीसी मतदार असून राजकीय गणिते आखण्यासाठी ओबीसी चेहरा असलेल्या व गावच्या राजकारणातील प्रमुख समजल्या जाणाऱ्या 'भिमेवार' कुटुंबातील इंदूबाई प्रभाकर भिमेवार यांची उपसरपंचपदी वर्णी लागणार असल्याची अपेक्षा ओबीसी समाजाला आहे.

महिला वर्गातील नंदा किशन देशमुख यांना पुढे करून कुटुंबातच उपसरपंच पद ठेवण्याचा पर्याय खुला आहे. तर प्रदीर्घ अनुभव असलेले माजी शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष तथा ग्रामपंचायत सदस्य विलासराव देशमुख हेही भक्कम पर्याय आहेत. विरोधी गटात असताना ज्यांचा मोठा वकुब होता असे माणिकराव लोमटे हेही एक उपसरपंच पदाचे प्रमुख दावेदार समजले जातात. तेव्हा लोमटे, भिमेवार की अनुभवी देशमुख यांच्यापैकी कुणाची उपसरपंचपदी वर्णी लागणार ? की नवीन चेहऱ्यास समोर आणून अनुभवी जेष्ठांना दूर केले जाणार हेच आता पाहावे लागेल!

## खोट्या बलात्काराच्या केसेसमुळे खऱ्या प्रकरणांवरही परिणाम – उच्च न्यायालयाचा आदेश

**अक्षराज : चंदन सिंह**

**दि.१३, मुंबई :** खोट्या बलात्काराच्या केसेसमुळे खऱ्या प्रकरणांवरही परिणाम होत असल्याचे निरीक्षण नोंदवत, बॉम्बे उच्च न्यायालयाने बुधवारी महाराष्ट्राचे पोलीस महासंचालक यांना एक आदेश दिला आहे. नवी मुंबईतील एका व्यक्तीच्या अर्जाचा विचार करण्यास सांगण्यात आले आहे. या व्यक्तीने एका पोलीस अधिकाऱ्याच्या चौकशीची मागणी केली आहे, जो कथितपणे सिरियल तक्रारदारांच्या सांगण्यावरून निष्पाप पुरुषांविरुद्ध खोट्या बलात्काराच्या केसेस दाखल करण्यात महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचा आरोप आहे.

न्यायमूर्ती रेवती मोहिते-देरे आणि न्यायमूर्ती डॉ. निला गोकले यांच्या खंडपीठाने सांगितले की, अशा प्रकरणांमध्ये संबंधित पुरुषाची प्रतिष्ठा गमावली जाते. राज्य सरकारने हे लक्षात घेतले पाहिजे की अशा खोट्या प्रकरणांमुळे पुरुषांची बदनामी होते. आणि मग यामुळे खऱ्या प्रकरणांवरही परिणाम होतो, असे न्यायमूर्ती मोहिते-देरे यांनी तोंडी निरीक्षण नोंदवले.

याचिका करणाऱ्या व्यक्तीने आपल्या अर्जात दावा केला आहे की, महिला वकिलांचे एक संघटित टोळकं दिल्ली, हरियाणा, उत्तर प्रदेश, महाराष्ट्र आणि इतर राज्यांमध्ये कार्यरत आहे. या टोळीतील महिला वकील प्रथम व्यावसायिक आणि श्रीमंत पुरुषांशी संबंध प्रस्थापित करतात, नंतर सुरुवातीला लहान रकमेची मागणी करतात आणि नंतर बलात्काराच्या गुन्ह्याची भीती दाखवून मोठी खंडणी वसूल करतात.

यासाठी त्यांनी अत्यंत कुशाग्र आणि नियोजित पद्धतीने युक्ती रचली आहे. अशा महिला केवळ महिलांच्या संरक्षणासाठी असलेल्या कायद्यांचा गैरवापर करत आहेत, असे याचिकाकर्त्याने म्हटले आहे.

याचिकाकर्त्याच्या वकिलांनी न्यायालयाला सांगितले की, नवी मुंबई आणि ठाण्यात दोन महिला वकील सातत्याने




अशा खोट्या केसेस दाखल करतात. त्यांच्या बहुतांश प्रकरणांत आरोपींना न्यायालयाने दोषमुक्त केले आहे किंवा त्या केसेस मागे घेतल्या गेल्या आहेत. मात्र, तोपर्यंत आरोपी पुरुषांना वर्षानुवर्षे तुरुंगात घालवावे लागते. मी सुमारे तीन वर्षे तुरुंगात होतो. माझे आयुष्य, करिअर आणि भवितव्य उद्ध्वस्त झाले आहे. माझ्या आयुष्याचे हे तीन वर्षे परत मिळणार नाहीत, असे याचिकाकर्त्याने म्हटले आहे.

न्यायालयाने या युक्तिवादाचा विचार करून, राज्य DGP यांना या प्रकरणाचा तपास करण्याचे निर्देश दिले. जर एखाद्या महिलेने वारंवार खोट्या तक्रारी केल्या असतील, तर तिच्यावर कारवाई करा. जर तुमच्या अधिकाऱ्याने तिच्याशी संगनमत केले असेल, तर त्याच्यावरही कारवाई करा, असे न्यायमूर्ती मोहिते-देरे यांनी स्पष्ट केले.

त्यामुळे न्यायालयाने DGP यांना आठ आठवड्यांची मुदत दिली असून, संबंधित पोलीस अधिकाऱ्याच्या चौकशीसाठी अधिकारी नेमण्याचे आदेश दिले आहेत. तसेच, या चौकशीचा अहवाल न्यायालयात सादर करण्यास सांगितले आहे.

# संपादकीय



## जीवन एक संघर्ष !

मानवी जीवन सरळसोट नाही. चढ उतार,खाच-खळगे आणि सुखदुःखाचा पाठशिवनीचा खेळ यांनी आपले जीवन भरलेले आहे. प्रत्येक दिवस नवीन आव्हान घेऊन पुढे येत असतो. त्याच्याशी दोन हात करणे म्हणजेच जीवन संघर्ष होय. संघर्षशिवाय जीवन निरर्थकच!जीवनात आपण प्रत्येक गोष्ट संघर्षाने मिळवत असतो.

छोटासा वाटणारा संघर्ष जगण्याची धडपड सांगत असतो. लहान मूल चालायला शिकण्यासाठी धडपडते. अनेक वेळा पडते. सायकल, दुचाकी, चार चाकी वाहन चालवण्यास शिकणे ; इतकेच नव्हे तर आकाशात भरारी घेण्यासाठी ते तेव्हाच आपले पाय बळकट करत असते. आईकडे पाहून बोलण्यास शिकणारे बाळ पुढील काळात आपल्या बोलण्याने अनेकांची मने जिंकते. उत्तम वक्ता बनू शकते. प्रशासकीय अधिकारी, निवेदक , शिक्षक, राजकारणी इतकेच नव्हे तर अनेकांना सन्मार्ग दाखवणारे अध्यात्मिक गुरु देखील आपल्या वक्तृत्वाच्या जोरावर ते बनू शकते. प्रत्येक कला,कौशल्य,ज्ञान,विज्ञान, व्यवहार ज्ञान, भेटणाऱ्या लोकांचे मनोविश्लेषण अशा अनेक बाबी व्यक्तीला आपल्या जीवनात शिकून जीवनात यशस्वी व्हावे लागते.एखादा योद्धा युद्धामध्ये आपल्या पराक्रमाची शिकस्त करतो. आपल्या जवळ असणारे सर्व शस्त्र आणि अस्त्र कौशल्याने वापरतो. त्याला त्या युद्धात आपल्या स्वतःचे रक्षण करायचे असते ; आणि शत्रूवर हल्ला देखील करायचा असतो. जीवन संघर्ष देखील काहीसा असाच असतो. फरक एवढाच की या संघर्षात शत्रु उघड उघड समोर नसतो. शत्रू अनेक रूपात येत असतो. कधी परिस्थिती तर कधी माणसं, कधी निसर्ग तर कधी व्यवस्था त्याला खिंडीत पकडत असतात.शेतकरी आपल्या शेतात पिक घेतो. पेरणी करण्यापूर्वी त्याला पैसा उभा करावा लागतो. पतसंस्था आणि बँका यांचे उंबरठे त्याला झिजवावे लागतात. पैसा उभा केल्यानंतर बियाणं पेरावं लागतं. बोगस बियाणं उगवलं नाही, पेरल्यानंतर पाऊस पडला नाही अशा घटनांमुळे दुबार पेरणी करावी लागते. पीक आल्यानंतर तण काढणं, पिक हाताला आलं,की पाखरं हाकलनं इथे पासून ते मळणी करून धान्य घरात आणून बाजारात योग्य भाव मिळण्यापर्यंत त्याचा संघर्ष सुरू असतो. बांधकाम करणारा गवंडी आयुष्यभर वाळू, सिमेंट,ऊन, वारा, पाऊस, ठेकेदार मालक, इंजिनियर या सर्वांशी संघर्ष करतो. दुसऱ्याची घरे उभारणाऱ्या या गवंड्याला स्वतःचं घर उभा करणं कधी कधी जमत नाही. दुसऱ्याला स्वच्छ नीटनेटके कपडे देणारा धोबी स्वतः मात्र मळकट कपडे घालून आयुष्याशी दोन हात करत असतो. उंच इमारतीच्या शेवटच्या मजल्यावरून पाळण्यातून खाली उतरून रंग देणारे रंगारी खरंतर जगण्या मरण्याची लढाईच लढत असतात. इमारत आकर्षक आणि देखणी बनवता बनवता रंगारी दिवसभरात अनेक रंगाने नाहून निघतो. अंतर्गत गटारात उतरून ती स्वच्छ करणारे सफाई कर्मचारी, घंटागाडी वरील आणि झाडू मारणारे महानगरपालिकेचे सफाई कर्मचारी परिसर स्वच्छ करण्यासाठी स्वतः अस्वच्छ होत असतात. बऱ्याच वेळा त्यांना शारीरिक आजाराविरुद्ध संघर्ष करावा लागतो. खाणकामगार हातात घन घेऊन या धरणी मातेशीच संघर्ष करतो. शिक्षकाचा संघर्ष हा समाजातील अज्ञानाविरुद्ध असतो. शासकीय कर्मचारी,पोलीस आणि उच्चपदस्थ अधिकारी यांचा संघर्ष हा गैरसोई, आराजकता आणि संभाव्य अंदाधुंदी विरुद्ध असतो. राजकीय आणि सामाजिक कार्यकर्त्यांचा संघर्ष व्यक्ती स्वातंत्र्यासाठी, समता, बंधुभाव आणि न्याय व्यवस्था निर्माण होण्यासाठी असतो. समाजातील प्रत्येक घटकाचा संघर्ष एकाच वेळेस सुरू असतो. वैयक्तिक जीवनातील अडीअडचणी बरोबर दोन हात करता करता समाज आणि देश उभारणीचे काम प्रत्येक जण करत असतो. स्वतःच्या जीवनाला आकार देता देता इतरांच्या जीवनाचे मळे फुलवायचं काम प्रत्येक जण करत असतो. बालपण, तरुणपण आणि म्हातारपण हे कोणालाही चुकलं नाही. बाल्या अवस्थेत सुप्त स्वरूपात सुरू झालेला संघर्ष तरुण वयात जोमात येतो. तरुणपण म्हणजेच संघर्ष ही व्याख्या बनते. आशा अपेक्षा ओसंडून वाहू लागतात. अटकेपार झेंडे गाडले जातात. आत्मविश्वासाला उधान येतं. अनेकांना एकाच वेळी अंगावर घेतलं तरच त्या तारुण्याला अर्थ प्राप्त होतो. इतर त्याचे गोडवे गाऊ लागतात. बौद्धिक,शारीरिक, भावनिक स्थैर्य राखत मनोधैर्य वाढवत तारुण्यात संघर्ष करावा लागतो. बघता बघता तरुणपण सरतं... वार्धक्यात संघर्षाची धार बोथट होते. शारीरिक मर्यादा वाढू लागतात. मन पूर्वीसारखं उभारी घेत नाही. धाडसाची जागा बचावात्मक कार्यपद्धतीने घेतलेली असते. जुनी भूतं हळूहळू मनगुटावर बसू लागतात. जीवन संघर्षाचा आलेख उतरणीचा मार्ग धरू लागतो. परतीचा मार्ग सुरू होतो. पुढील मार्ग हा साऱ्यांशी जुळवून घेण्याचा असतो. हत्यारं खाली ठेवून जीवन संघर्षा मध्ये आत्मसमर्पणाची वेळ येते. संघर्ष थांबतो आणि माणुसही...

# विनोद सम्राट दादा कोंडके

आज १४ मार्च, आपल्या इरसाल आणि गावरान भाषेतील विनोदाने महाराष्ट्राला खळखळून हसवणारे विनोद सम्राट शाहीर दादा कोंडके यांचा स्मृतिदिन. जवळपास तीन दशकांहून अधिक काळ मराठी चित्रपट सृष्टीवर एकहाती अधिराज्य गाजवून मराठी सिनेमाला सुवर्णकाळ दाखवणाऱ्या विनोद सम्राट दादा कोंडके यांचा जन्म ८ ऑगस्ट १९३२ रोजी मुंबईतील नायगाव येथे झाला. त्यांचा जन्म झाला तो दिवस गोकुळ अष्टमीच्या होता, आपल्या पोटी बाळकृष्ण जन्माला आला म्हणून आई वडिलांनी त्यांचे नाव कृष्णा ठेवले. पण लहानपणापासूनच सर्व जन त्यांना दादा म्हणत पुढे त्यांचे नाव रूढ झाले. त्यांच्या मोठ्या बंधूचे निधन झाल्याने त्यांच्यावर घराची जबाबदारी पडली त्यामुळे दादा दरमहा साठ रुपये पगारावर सेवादलाच्या बँड पथकात काम करू लागले. लहानपणापासून दादांना कलेची आवड होती. सेवादलाच्या बँड पथकात त्यांच्या कला आणखी बहरून आल्या. फावल्या वेळात प्रसिद्ध गाण्यांचे विडंबन करणे, गाण्यांना चाली लावणे, विचित्र गाणी रचणे असे उद्योग दादा करू लागले. निळू फुले, राम नगरकर यासारखे जेष्ठ कलाकारही त्या काळात सेवादलात होते. तिथेच दादांची या महान कलाकारांशी मैत्री झाली आणि ही मैत्री पुढे आयुष्यभर टिकून राहिली. दादा सेवादलाच्या बँड पथकात काम करत असल्याने त्या काळात त्यांना बँड वाले दादा म्हणूनच लोक ओळखत असे. पुढे दादांनी स्वतःचा फड काढला. गावोगावी जाऊन दादा स्वतःची कला सादर करू लागले. वसंत सबनिसांच्या विच्छा माझी पुरी करा या वगनाट्याने त्यांच्या जीवनाला कलाटणी मिळाली. विच्छा माझी पुरी करा या वगनाट्याने दीडशे प्रयोग पूर्ण केले. त्या काळी



हा विक्रम होता. या वगनाट्यामुळे दादा भलतेच लोकप्रिय झाले. गावागावांतील रसिक प्रेक्षक दादांना ओळखू लागले. याच वगनाट्यातील त्यांचे काम पाहून महान दिग्दर्शक भालजी पेंढारकर यांनी त्यांना थेट चित्रपटात काम करण्याची संधी दिली. भालजी पेंढारकर यांनी त्यांना त्यांच्या तांबडी माती या चित्रपटात मुख्य भूमिका दिली. दादांनी या भूमिकेचे सोने केले. हा चित्रपट तिकीटबारीवर हिट झाला. या चित्रपटातील गाणीही लोकप्रिय झाली. या चित्रपटानंतर दादांनी मागे वळून पाहिले नाही. मराठी चित्रपट सृष्टीत दादा कोंडके हे सर्वत्र नाव घुमू लागले. १९७१ साली दादा कोंडके यांनी दिग्दर्शित केलेला सोंगाड्या हा चित्रपट प्रदर्शित झाला मात्र मुंबईतील चित्रपटगृह चालकांनी आपल्या चित्रपटगृहात सोंगाड्या न लावता तीन देविया हा हिंदी चित्रपट लावला. आपल्या पहिल्याच चित्रपटाला चित्रपटगृह मिळत नसल्याचे पाहून दादा उद्विग्न झाले आणि त्यांनी थेट बाळासाहेब ठाकरेंची भेट घेतली मग काय बाळासाहेबांचा आदेश आणि शिवसैनिकांचा चित्रपटगृहात राडा. शिवसैनिकांनी चित्रपटगृहात घातलेल्या राड्याने आणि बाळासाहेबांच्या आदेशाने सोंगाड्या चित्रपटगृहात प्रदर्शित झाला. नुसताच प्रदर्शित झाला नाही तर सुपर डूपर हिट झाला. सोंगाड्या पाहायला प्रेक्षकांच्या रांगा लागल्या. सोंगाड्या हा त्या काळातील सर्वाधिक हिट मराठी चित्रपट ठरला. सोंगाड्यामुळे मरगळलेल्या मराठी चित्रपट सृष्टीला ऊर्जितावस्था मिळाली. तमाशापटाला कंटाळलेल्या मराठी चित्रपट रसिकांना सोंगाड्यात दादांनी आपल्या विनोदाने मनमुराद हसवले. दादांच्या विनोदाला मराठी रसिकांनी मनमुराद दाद दिली. सोंगाड्याच्या अभूतपूर्व यशानंतर दादा कोंडके यांनी आणखी एका नव्या चित्रपटाची घोषणा केली या चित्रपटाचे नाव होते एकटा जीव सदाशिव. सोंगाड्यामुळे दादांची लोकप्रियता तुफान वाढली होती. या लोकप्रियतेचा धसका हिंदी चित्रपट सृष्टीनेही घेतला होता. दादांनी एकटा जीव सदाशिव या चित्रपटाची घोषणा केल्यावर राज कपूर यांनी त्यांच्या मुलासाठी म्हणजे ऋषी कपूर साठी काढलेला बॉबी या चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख पुढे ढकलली. सोंगाड्या पाठोपाठ एकटा जीव सदाशिव हा चित्रपटही सुपर हिट झाला. त्यानंतर दादांनी पांडू हवालदार या चित्रपटाची निर्मिती केली. या चित्रपटात दादांनी अशोक सराफ यांना संधी दिली. हा चित्रपटही यशस्वी ठरला मग काय त्यानंतर दादांच्या यशस्वी चित्रपटांची मालिकाच सुरू झाली. तुमचं आमचं जमल, राम राम गंगाराम, बोट लावील तिथं गुदगुल्या, ह्योच नवरा पाहिजे, आली अंगावर, मुका घ्या मुका, पळवा पळवी, येऊ का घरात, सासरचे धोतर असे दादांचे सलग चित्रपट यशस्वी झाले. सलग नऊ रौप्य महोत्सवी चित्रपट देण्याचा विक्रम दादांनी केला. त्यांच्या या विक्रमाची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये झाली. त्यांच्या यशस्वी चित्रपटात त्यांच्या इरसाल विनोदाचा जितका वाटा होता तितकाच त्या चित्रपटातील श्रवणीय गाण्यांचा देखील होता. दादा कोंडके यांच्या चित्रपटातील सर्व गाणी गाजली. आजही दादांच्या चित्रपटातील गाणी तितकीच लोकप्रिय आहेत. दादांचे चित्रपट जितके लोकप्रिय झाले तितकेच ते वादग्रस्तही ठरले. त्यांच्या सर्वच चित्रपटांना सेन्सॉर बोर्डने आडकाठी आणली मात्र दादांनी सेन्सॉर बोर्डाच्या या दंडेली पुढे कधीही नमते घेतले नाही उलट सेन्सॉर बोर्डशी त्यांनी कायम दोन हात केले. ज्या शिवसेनेमुळे त्यांचे चित्रपट चित्रपटगृहात प्रदर्शित होऊ शकले त्या शिवसेनेशी त्यांनी कधीही प्रतारणा केली नाही. आयुष्यभर त्यांनी शिवसेनेशी बांधिलकी राखली. १४ मार्च १९९८ रोजी हृदय विकाराच्या झटक्याने त्यांचे निधन झाले. दादांच्या निधनाने मराठी मनोरंजन विश्वावर दुःखाचा डोंगर कोसळला. प्रेक्षकांना खळखळून हसवणाऱ्या विनोदाच्या या सम्राटाने अशी अकाली एक्झीट घेतल्याने प्रेक्षकांना मोठा धक्का बसला. त्यांच्या निधनाने मराठी मनोरंजन विश्वाला सुवर्णकाळ दाखवणारा विनोदाचा सम्राट काळाच्या पडद्याआड गेला. मराठी चित्रपट सृष्टीत त्यांच्यासारखा विनोद सम्राट पूर्वी झाला नाही आणि पुढेही होणार नाही. विनोद सम्राट दादा कोंडके यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

# महाबोधी विहार व्यवस्थापन बौद्धांना द्यावे या संदर्भात ठाणे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**अक्षराज : तानाजी ताकतोडे**

**दि.१३, कोर्टनाका (ठाणे) :** दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया आणि वंचित बहुजन आघाडी यांच्या संयुक्त विद्यमाने, भारतीय बौध्द महासभा शाखा ठाणे जिल्हा व तालुका यांच्या वतीने, महाबोधि विहार मुक्ती संदर्भातील राज्यव्यापी आंदोलनांच्या निमित्ताने, ठाणे जिल्हाधिकारी कार्यालय येथे महाबोधी महाविहार ताबा मागणी करण्यासाठी, कोर्ट नाका येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथून आंदोलनाला सुरुवात करण्यात आली. बिहार येथील महाबोधी विहार मुक्ती आंदोलन करून, महाबोधी विहार संहिता



१९४९ रद्द करून, आंतरराष्ट्रीय बौद्ध भिक्खू संघटन व भारतीय बौद्ध भिक्खू संघटन यांच्या ताब्यात व्यवस्थापन देण्यात यावे याकरिता ठाणे जिल्हाअधिकारी यांना निवेदन देण्यात आले. सदर प्रसंगी भंते धमप्रिय बी.एच. गायकवाड (राष्ट्रीय सचिव), एस.एस. वानखडे (केंद्रीय प्रशिक्षण विभाग प्रमुख), राजेश पवार (राष्ट्रीय सचिव), डी.एम. आचार्य (हेडक्वार्टर सचिव एस.एस.डी.), विजय गायकवाड (अध्यक्ष ठाणे जिल्हा), सुनिल निकम (अध्यक्ष ठाणे तालुका) आणि ठाणे जिल्ह्यातील तालुका, शहर, ग्राम, वार्ड, शाखा पदाधिकारी, बौध्दाचार्य, केंद्रीय शिक्षक, समता सैनिक दल अधिकारी व सैनिक, बौध्द उपासक, उपासिका, आणि बौद्ध बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## धुळवड ..

वैशाखशुद्ध पौर्णिमा
साजरी झाली होळी
षडरिपु दग्ध सगळे
दुर्गुणी कचरा जाळी

बोंबा बोंब आग डोंब
एक दिवस शिवराळी
शुध्द होई जिव्हेआता
अभद्रअपशब्द टाळी

संघभावना मनी रूजे
स्नेह बंधना कवटाळी
प्रेम खाता पुरणपोळी
वैरभाव क्रोध पिटाळी

शांतवे तप्त हुताशनी
नवोत्साह ये सकाळी
धुळीस वंदन करून रे
राख लावावी कपाळी

अनेक गुण चिखलात
सुसह्य हवा रे उन्हाळी
नवचैतन्य पुन: उसळे
निसर्गा अर्पित बहाळी

तप्त होईलं धरोवर ही
रे बहरेल शुष्कडहाळी
ऋतु चक्र सणात गुण
परिधान नवी नव्हाळी

धुळवड न उमत्त मस्ती
पवित्रता शिकवे होळी
संस्कृती कळो आगळी
का बाजू पाहतो काळी

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

# धुरोड्याची जुगाडी पिचकारी

माझ्या गावाकडील भाषेत धुलीवंदनाला धुरोडा म्हणतात.लहानपणीचा आमचा धुरोडा आगळावेगळाच...! धुरवड्याची पिचकारीही आगळी वेगळीच...! पिचकारी विकत घ्यायची तर पैशाची अडचण...! पाच अन दहा रुपये म्हणजे खुप..! अन त्यावेळेस गावात दुकानेही कमी मग,आम्ही मुलं गावठी जुगाड वापरून पिचकारी तयार करायचो पण धुरोडा साजरा करायचो तेही अगदी मजेत अन आनंदात.....! भौतिक सुखापेक्षा आत्मिक सुख महत्त्वाचे अगदी दिलखुलास पणे....!पिचकारी बनवायला धुरोड्याच्या आदल्या दिवसापासून तयारीला लागायचो. गावाकडे ग्राम पंचायतचे नळजोडणी, त्यासाठी अर्धा किंवा पाऊण इंचीचे पाईप वापरायचे त्यातील उरलेला पाईपाचा तुकडा अन त्याच आकाराचे बुच्चन..!

अर्थात झाकण घ्यायचो. दीड फुटाचा पाईपचा तुकडा असेल तर काठी साधारण दोन तेअडीच फुटाची.कारण हातात पकडून रंग किंवा खेचण्यासाठी शिल्लक घ्यायचो.बापाच्या फाटलेल्या पांढऱ्या बनियानच्या कपड्याची चिंधी किंवा मायच्या लुगड्याची सुती कापडाची चिंधी हे आमच पिचकारी बनवण्याचं साहित्य.

पिचकारी बनवायला सर्वप्रथम उरेलेलं अर्ध्या इंचाचे किंवा पाऊन इंचाचे साधारण दीड फुटाचे पाईपचे तुकडे घेऊन त्याच मापाचं झाकण घ्यायचो.गोलाकार झाकण त्याच्या टाळूचा आकार असलेल्या बरोबर मध्यभागी सुई किंवा दामन चुलीत गरम करून बारीक भोक पाडायचो,जेणेकरून त्यातून पाणी आत बाहेर खेचता अन बाहेर सोडता येईल. ते झाकण नळीच्या, पाईपच्या तुकड्याच्या एका टोकाला लावायचो.एक बाजू पूर्ण बंद करून घ्यायचो. त्यानंतर एक दोन ते अडीच फुटाची खैराची किंवा शेवग्याची काठी घ्यायचो कि जेणेकरून त्या नळीत सहज जाईल. काठी वेडीवाकडी किंवा मध्ये कुठे खरबडीत भाग असेल तर फुटलेल्या बाटलीच्या काचेच्या तुकड्याने घासून-घासून काठीला गुळगुळीत करायचो.जेणेकरून त्या पाईप मध्ये



जाईल. काठीच्या गुळगुळीत पुढील टोकाजवळ फाटलेल्या बनियानची चिंधी किंवा मायेच्या फाटलेल्या लुगड्याची चिंधी गुंढाळून ती गुळगुळीत केलेली काठी त्या पाईप मध्ये ढकलायचो. त्यामुळे आतील भाग कपड्याच्या चिंधीनं आतून पूर्ण बंद व्हायचा, त्यामुळे त्यातून पाणी किंवा रंग गळत नव्हता.पिचकारीचा झकणाकडील कडील भाग अगदी हलक्या स्वरूपाने त्यात बुडवायचा आणि काठी हळूहळू मागे खेचायची. पिचकारीच्या आतील भागात पाणी जमा व्हायचं. मागे खेचलेली काठी जोरात पुढे प्रेशरने पुढे ढकलायचो असं किती तरी वेळा एका पातेल्यात किंवा साचलेल्या पाण्यात करून बघावं लागायचं. एकदाचा हा प्रयोग यशस्वी झाला कि, जुगाडी पिचकरी तयार झाली म्हणून समजायची.

धुलिवंदनाचा रंग ही असाच अगदी नैसर्गिक बनवायचो. रानोमळ फिरून पळसाची फुल जमा करायचो. त्याला हाताने चूरगाळून,कुटून पाणी टाकून रंग तयार करायचो तसेच पूर्वी खेड्यात पुरुष मंडळी सदरा,टोपी, धोतर, विजारी नेसायचे काही अंशी अजूनही आहेत,त्यामुळे कपडे धुतले कि त्यात निळ टाकायचे.तर ती निळच आमच्या धुलिवंदनातील रंग होऊन जायचा. त्यापुढील धुलीवदंनातील आमचा अगदी बिनखर्चिक म्हणजे रंग काळा..! तर तो असा कि,गावाकडे बहुतेक घरामध्ये चुली पेटवायचे. भाकरी बनवण्यासाठी चुलीवर ठेवलेल्या तव्याच बुड काड्याच्या धूरानं काळकुट्ट व्हायचं. मग काय उपडया ठेवलेल्या तव्यावर हाताचे पंजे फिरवले अन त्यावर पाण्याचे दोन चार थेंब ओतले कि,रंग तयार....! विशेषत: होळी ला टाकणीतील जुने कपडे घालायचो कारण आमचा धुरोडा म्हणजे हा असा रांगडा...!कपड्याचा मुळ रंग गायब होऊन कपडे पूर्ण रंगींबेरंगीं होऊन जायचे.संध्याकाळपर्यंत तोंड पार माकडासारखी व्हायची...!अश्या ह्या जुगाडी रंगानी अन पिचकारीनं गुपचूप लपून छपून जाऊन, मित्रांच्या अंगावर रंग शिंपडून यायचो अन पळून जायचो....! या रंगाची न कोणाला ॲलर्जी न त्वचारोग मात्र,दोन चार दिवस कानातील, डोक्यातील तळहातावरील रंग जात नव्हता..! असाच घट्ट..!गावाकडील जिवलग,निखळ प्रेमळ मैत्रीसारखा ! टिकून राहायचा.लई मज्जाच मजा यायची...!

अशी ही माझ्या गावाकडील पिचकारी हल्लीच्या पिचकारी पेक्षा अगदी आगळीवेगळी,बिन खर्चिक, जुगाडी पिचकारी..! लय मौल्यवान...! बालमित्रांच्या आठवणीसह हृदयाच्या कोपऱ्यात अजूनही कायम घर करून बसली आहे.

**सर्वांना होळी व धुलीवंदनाच्या**
**खूप खूप शुभेच्छा....!**

**श्री.विनोद शेनफड जाधव**
**मासरूळ, जि.बुलढाणा**
**मो.नं.९७६३२८२०७७**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## पोलीस शिपाई गुरुनाथ जरग यांच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल प्रशस्तीपत्र प्रदान



**अक्षराज : भानुदास गायकवाड**
**दि.१३, डोंबिवली (ठाणे) :** ठाणे शहर गुन्हे शाखेच्या घटक-३ कल्याण विभागातील पोलीस शिपाई गुरुनाथ छाया संतराम जरग यांनी उत्कृष्ट तपास कौशल्य व तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे मोठ्या गुन्ह्याचा छडा लावत पोलीस खात्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

विष्णुनगर पोलीस ठाण्यात नोंद असलेल्या गुन्हा रजि. नं. १६/२०२५ अन्वये, बी.एन.एस. २०२३ च्या कलम ३०५, ३३१(३), ३३१(४) अंतर्गत नोंद झालेल्या गंभीर गुन्हाचा तपास करत असताना, पोलीस शिपाई गुरुनाथ जरग यांनी घटनास्थळ व परिसरातील सीसीटीव्ही फुटेजचे सखोल विश्लेषण केले. त्यानंतर संशयित आरोपीचा माग काढत, भिवंडी (जि. ठाणे) येथून आरोपीला अटक करण्यात यश मिळवले. तपासादरम्यान, आरोपीकडून चोरीस गेलेल्या तब्बल ५३,४१,२८०/- रुपये किमतीच्या ६६७ ग्रॅम ६६० मिली वजनाच्या सोन्याच्या दागिन्यांसह ७८,९००/- रुपये रोख रक्कम असा एकूण ५४,२०,१८०/- रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. याशिवाय, ठाणे शहर पोलीस आयुक्तालयातील एकूण ५० घरफोडी व चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्यासही त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान ठरले. उल्लेखनीय कामगिरीबद्दल ठाणे शहर पोलीस आयुक्त आशुतोष डुबरे यांनी पोलीस शिपाई गुरुनाथ जरग यांना प्रशस्तीपत्र प्रदान करून सन्मानित केले.पोलीस खात्याच्या गौरवशाली परंपरेला पुढे नेत, भविष्यातही अशीच उत्कृष्ट सेवा बजावून खात्याची प्रतिमा उंचावण्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केली.

## ऐरोली विभागात अतिक्रमण विभागाची धडक कारवाई

**अक्षराज : जे. के. पोळ**
**दि.१३, ऐरोली (नवी मुंबई) :** महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामाविरोधात नवी मुंबई महानगरपालिका विभागामार्फत मा. आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त (२) डॉ. राहुल गेठे व उप आयुक्त (अतिक्रमण) भागवत डोईफोडे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने ऐरोली विभागात निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील जी विभाग ऐरोली अंतर्गत मुलचंद ललहारी निशाद यांचे सी– २१७, से-०२, ऐरोली व धोंडीबा हरिषा जाधव, सी– २६६, से-०२, ऐरोली तसेच शकुंतला उनवणे, बी– ४५७, से-०२, ऐरोली येथील बांधकाम नवी मुंबई महानगरपालिकेची कोणतीही परवानगी न घेता अनधिकृतपणे केलेले होते. सदर अनधिकृत बांधकामास ऐरोली विभागामार्फत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ मधील कलम ५४ अन्वये नोटीस बजाविण्यात आलेली होती. संबंधितांनी केलेले अनधिकृत बांधकाम स्वतःहून हटविणे आवश्यक होते. परंतु त्यांनी अनधिकृत बांधकाम स्वतःहून हटविले नसल्याने सदरचे अनधिकृत बांधकाम आज दिनांक ११ मार्च २०२५ रोजी अतिक्रमण मोहिम राबवून सदर बांधकाम अंशत: निष्कासित करण्यात आले आहे. या धडक मोहिमेसाठी जी विभाग ऐरोली विभागाचे सहाय्यक आयुक्त तथा विभाग अधिकारी डॉ. अंकुश जाधव, कनिष्ठ अभियंता संदिप म्हात्रे तसेच मोहिमेकरीता जी विभाग ऐरोली, येथील अधिकारी / कर्मचारी तसेच अतिक्रमण पोलिस पथक उपस्थित होते. सदर मोहिमेकरीता गॅस कटर, हॅमर व मजूर यांचा वापर करण्यात आलेला आहे.

## राष्ट्रीय कर्मचारी सेना शिक्षण विभागातर्फे आंदोलनाचा इशारा

**अक्षराज : वृत्तसंकलन**
**दि.१३, मुंबई :** बृहन्मुंबई परिक्षेत्रातील खाजगी अनुदानित व विनाअनुदानित प्राथमिक शाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना माहे ऑगस्ट २०२३ पासून सातव्या वेतन आयोगाची अंमलबजावणी मनपा प्रशासनाकडून करण्यात आली. मात्र, त्यानंतर अनेक वेळा पत्रव्यवहार व पाठपुरावा करून, अधिकारी वर्गांच्या भेटी घेऊन सुध्दा सातव्या वेतन आयोगाची थकबाकी, प्रवासभत्ता अद्यापही देण्यात आलेला नाही. मात्र, मनपा शिक्षक व कर्मचारी यांना हे सर्व लाभ वेळेत देण्यात आलेले आहेत. प्रलंबित मागण्यांसंदर्भात अनेकवेळा पत्रव्यवहार व पाठपुरावा करूनही प्रशासनाकडून कोणत्याही प्रकारचा सकारात्मक प्रतिसाद मिळत नसल्यामुळे मुंबईतील सर्व माध्यमाच्या अनुदानित व विनाअनुदानित शाळांतील शिक्षक व कर्मचारी यांच्यामध्ये राज्य व मनपा प्रशासन यांच्याबद्दल उदासिनता व रोष निर्माण झालेला आहे. त्यामुळे पुढील प्रलंबित मागण्यांकडे राज्य व मनपा प्रशासनाचे लक्ष वेधून घेण्यासाठी राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशन काळात मुंबईतील विविध माध्यमाच्या शेकडो शिक्षक व कर्मचारी यांच्या उपस्थितीत राष्ट्रीय कर्मचारी सेना शिक्षण विभागाने १) सातव्या वेतन आयोगानुसार थकबाकी आणि प्रवासभत्ता मिळणे, २) सेवानिवृत्त कर्मचारी यांचे सेवानिवृत्ती वेतन व वेतनादी फायदे सातव्या वेतन आयोगानुसार मिळावेत, ३) ९२ विनाअनुदानित शाळांच्या अनुदानाची प्रत्यक्ष अंमलबजावणी करणे, ४) शाळांची प्रथम मान्यता हीच कायमस्वरूपी मान्यता ग्राह्य धरणे, ५) शाळांना वेतनेतर अनुदान देणे, ६) अंशतः अनुदानित शाळातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची कालबद्ध पदोन्नती मधील मे २०२० पूर्वीची थकबाकी मिळविणे, ७) सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांकडून नियमबाह्य पद्धतीने वसूल केलेली जादा अधिदानाची रक्कम परत मिळवणे, ८) अंशतः अनुदानित शाळातील शिक्षण सेवकांना सहाय्यक शिक्षक पदी नियुक्ती करताना बुडवलेली थकबाकीची रक्कम मिळविणे, ९) शिक्षक पदाची २४ वर्षे सेवा पूर्ण करून मुख्याध्यापक पदी नियुक्त झालेल्या मुख्याध्यापकांना निवड श्रेणी लागू करणे.या मागण्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधून घेण्यासाठी १८ मार्च रोजी सकाळी १०.०० ते ५.०० या वेळेत आझाद मैदान, मुंबई येथे भव्य लक्षवेधी आंदोलन आयोजित केले आहे. आपल्या मागण्यांकडे हीच योग्य असल्यामुळे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी या आंदोलनास मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपली ताकद व एकजूट दाखवावी असे आवाहन करण्यात आले आहे. या आंदोलनास मुंबईतील विविध शिक्षक संघटना व संस्थाचालक संघटना यांनीही जाहीर पाठिंबा दर्शवलेला आहे.

## ठाणे जिल्हाधिकाऱ्यांनी केले हेल्मेटचे मोफत वाटप

**अक्षराज : जे. के. पोळ**
**दि.१३, ठाणे :** प्रादेशिक परिवहन कार्यालय, ठाणे, आवास फायनान्स लिमिटेड, राजस्थान सडक सुरक्षा सोसायटी आणि स्टीलबर्ड कंपनी यांच्या संयुक्त विद्यमाने दि.१२ मार्च २०२५ रोजी जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या हस्ते जिल्हाधिकारी तसेच कोषागार कार्यालयामधील एकूण १२० दुचाकी चालकांना हेल्मेटसचे मोफत वाटप करण्यात आले.

या उपक्रमास सामाजिक कार्यकर्ते राजेश कोलुंगाडे, जितेन कपानी, डॉ.वैभव ठाकरे यांचे सहकार्य लाभले. यापूर्वीच जिल्ह्यातील सर्व आस्थापनांवरील दुचाकी चालविणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांनी कार्यालयात येताना हेल्मेटचा वापर करणे बंधनकारक असल्याचे जिल्हाधिकारी कार्यालयाने परिपत्रकाद्वारे कळविले आहे.

# नाशिकच्या साहिल पारखची बीसीसीआयच्या १९ वर्षांखालील एलिट कॅम्पसाठी निवड..

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**
**दि.१३, नाशिक :** नाशिक जिल्हा क्रिकेटसाठी आनंदाची बातमी आहे. नाशिक जिल्हा क्रिकेट असोसिएशनचा युवा खेळाडू, आक्रमक डावखुरा सलामीवीर साहिल पारख याची बीसीसीआयच्या १९ वर्षांखालील राष्ट्रीय एलिट कॅम्पसाठी निवड झाली आहे. हा कॅम्प नॅशनल क्रिकेट अकादमी (NCA), बेंगळुरूच्या सेंटर ऑफ एक्सलन्स अंतर्गत २ ते २८ एप्रिल या कालावधीत आयोजित केला जाणार आहे. भारतभर विविध ठिकाणी होणाऱ्या या शिबिरात महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या एकूण सहा खेळाडूंचा समावेश आहे. साहिल पारख व योगेश चव्हाण हे दोघे पुदुचेरी येथे टीम सी मध्ये सहभागी होणार आहेत.

साहिल पारख याने सप्टेंबर २०२४ मध्ये ऑस्ट्रेलिया विरुद्धच्या १९ वर्षांखालील एकदिवसीय मालिकेत भारतीय संघाचे प्रतिनिधित्व करताना, आपल्या आक्रमक फलंदाजीने सर्वांचे लक्ष वेधले होते. या सामन्यात साहिलने ७५ चेंडूत नाबाद १०९ धावा (१४ चौकार, ५ षटकार) फटकावून भारतीय संघाला केवळ २२ षटकांत ९ गडी राखून विजय मिळवून दिला होता. त्याच्या या जबरदस्त प्रदर्शनामुळे त्याची बीसीसीआयच्या विनू मंकड स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघाच्या उपकर्णधारपदी निवड झाली होती.

साहिलची यापूर्वीही सलग दोन हंगाम छउअ बेंगळूरू तर्फे होणाऱ्या शिबिरासाठी निवड झाली होती.



राष्ट्रीय व राज्यस्तरीय स्पर्धांतील उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर त्याची तिसऱ्यांदा निवड झाली आहे. २०२३–२४ च्या हंगामात इंदोर येथे झालेल्या बीसीसीआयच्या विनू मंकड करंडक स्पर्धेत साहिलने ९ डावांत २ शतके व १ अर्धशतक झळकावत ३६६ धावा फटकावल्या, ज्यामुळे त्याची १९ वर्षांखालील एकदिवसीय चॅलेंजर ट्रॉफीसाठी इंडिया संघात निवड झाली होती.

साहिल पारखच्या या निवडीमुळे नाशिक जिल्हा क्रिकेट संघटना व क्रिकेट रसिकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. संघटनेचे चेअरमन विनोद शहा, सचिव समीर रकटे, तसेच प्रशिक्षक व पदाधिकाऱ्यांनी साहिलचे अभिनंदन करत त्याच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

साहिल पारखच्या या निवडीमुळे आगामी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कारकिर्दीसाठी नाशिककरांची उत्सुकता वाढली आहे !

# स्त्रियांना स्वतंत्र कार्य करण्याची संधी देणे म्हणजे खऱ्या अर्थाने सक्षमीकरण : सुवर्णा जगताप

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**
**दि.१३, विंचूर (नाशिक) :** केंद्र सरकार वस्त्रोद्योग हॅंडीक्राफ्ट आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले संस्थेच्या पुढाकारातून लासलगाव येथे महिला मेळावा संपन्न झाला.पाच जिल्ह्यांचे काम सांभाळत असलेले कोल्हापूरवरून आलेले केंद्र सरकारचे प्रतिनिधी आकाश मूलिक यांनी मार्गदर्शन केले. आणि नाशिक जिल्हा कोठ्यातील प्रलंबित कामे लवकर करण्यात येतील असे नमूद केले. हस्तकला, हातमाग, संबंधित कार्ड लवकरच वितरित करण्यात येतील. असे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले संस्थेच्या अध्यक्षा मायाताई परदेशी यांनी त्यांच्या मनोगतात सांगितले.

लासलगाव परिसरातील महिलांच्या




हाताला काम मिळावे यासाठी प्रतिबद्ध आहे. आणि जे जे करता येईल त्यासाठी मदत करण्याची ग्वाही लासलगाव कृऊ बा समितीच्या माजी सभापती तसेच दीप कन्स्ट्रक्शन इंडिया प्रा ली च्या मॅनेजिंग डायरेक्टर सुवर्णा जगताप यांनी सांगितले.भारताच्या सर्वांगीण विकासासाठी महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे महत्त्वाचे आहे. महिला सक्षमीकरण धोरणे महिलांना कर्मचाऱ्यांमध्ये सहभागी होण्याच्या संधी निर्माण करण्यावर लक्ष केंद्रित करतात, मग ते उद्योजकता, कौशल्य विकास कार्यक्रम किंवा रोजगार कोट्याद्वारे असो.महिलांची स्वतःचे महत्व ओळखण्याची भावना; निवड करण्याचा आणि निर्णय घेण्याचा त्यांचा अधिकार, घराच्या आत आणि बाहेर स्वतःच्या जीवनावर ,सामाजिक दिशांवर प्रभाव पाडण्याची त्यांची क्षमता हेच खर्या अर्थाने महिला सक्षमीकरण आहे.

बँक ऑफ महाराष्ट्राचे मॅनेजर नितीन बाविस्कर यांनी मुद्रा लोन आणि इतर लोन यांचा महिलांना होणारा फायदा सांगितला.नंतर मायाताई परदेशी, गौरव परदेशी, बँक ऑफ महाराष्ट्र लोन डिपार्टमेंट मॅनेजर सानप यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे आभार कविता आवारे यांनी मानले तसेच कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी कविता आवारे, सुरेखा कदम, ज्योती नेटारे, संध्या आहिरे, सुनीता बोडके, संगीता आव्हाड, सीमा पाटील, वैशाली गोर्डे, मनीषा नेटारे, यशश्री नेटारे. यांनी प्रयत्न केले.

# कुळगाव बदलापूर नगरपरिषदेची थकीत मालमत्ता धारकांवर धडक कारवाई

**अक्षराज : जे. के. पोळ**
**दि.१३, बदलापूर (ठाणे) :** मुख्याधिकारी कुळगाव बदलापूर नगरपरिषद यांच्याकडून मालमत्ता कराची १००% वसुली करण्याचे आदेश कर विभागास देण्यात आले आहेत. कर वसुली मोहिमेच्या २ दिवसांच्या कालावधीमध्ये एकूण २ कोटी ४१ लाख ८५ हजार २६४ इतकी रक्कम वसूल करण्यात आली आहे.

या पार्श्वभूमीवर कुळगाव बदलापूर नगरपरिषद हद्दीतील ज्या मालमत्ताधारकांचा मालमत्ता कर थकीत आहे, त्यांनी लवकरात लवकर आपला थकीत मालमत्ता कर जमा करून नगरपरिषदेस सहकार्य करून जप्तीची कटू कारवाई टाळावी, असे आवाहन कुळगाव बदलापूर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी मारुती गायकवाड यांनी केले आहे.

नगरपरिषद हद्दीत साधारणपणे १ लाख २१ हजार ६७१ मालमत्ता निवासी, १४ हजार ३६५ मालमत्ता वाणिज्य आणि ६४२ औद्योगिक मालमत्ताधारक आहेत. त्यानुसार नगरपरिषदेची सन २०२४–२५ या आर्थिक वर्षातील एकूण मागणी रक्कम रु.८१.८४ कोटी इतकी आहे. त्यापैकी नगरपरिषदेने जवळपास रक्कम रु.५७.५९ कोटी इतकी वसुली केली आहे. त्यापैकी ऑनलाईन पद्धतीने रु.१४.४१ कोटी रक्कम नगरपरिषदेकडे जमा झाली असून रु.२४.२५ कोटी इतकी थकबाकी नगरपरिषदेस येणे बाकी आहे.

रक्कम रु.१ लाख इतकी थकीत मालमत्ता कर असणारे साधारणपणे ७ हजार २०० थकबाकीदार आहेत. रक्कम रु.५० हजार ते १ लाख दरम्यान थकीत मालमत्ता कर असणारे साधारणपणे १० हजार ८०० थकबाकीदार आहेत आणि रक्कम रु.२५ हजार ते ५० हजार दरम्यान थकीत मालमत्ता कर असणारे साधारणपणे २१ हजार ६०० थकबाकीदार आहेत.

कुळगाव बदलापूर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी मारुती गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली दि.१० ते दि.१७ मार्च २०२५ दरम्यान थकीत रक्कम रु. २४.२५ कोटी वसूल करण्याकरिता विशेष वसुली मोहीम नियोजित करण्यात आली आहे. या मोहिमेकरिता नगरपरिषदेमार्फत ५ भरारी पथके गठीत करण्यात आली आहे. या पथकांमार्फत थकीत मालमत्ता करधारकाच्या मालमत्ता जप्त करणे किंवा अटकावणी करण्याची कारवाई करण्यात येणार आहे.

दि.१० मार्च २०२५ रोजी भरारी पथकांनी ५२ मालमत्तांची जप्ती केली असून त्याचा थकीत मालमत्ता कर रक्कम रु.६४ लाख १४ हजार ८९३ इतका आहे. तसेच थकीत मालमता कराची भरारी पथकाद्वारे रक्कम रु.३६ लाख ५१ हजार ३१० इतकी वसुली करण्यात आली आहे व नागरी सुविधा केंद्रातील भरणा रक्कम रु.५२ लाख ७९ हजार ५०८ इतकी आहे.

तसेच दि.११ मार्च २०२५ रोजी दुपारी ४ वाजेपर्यंत थकीत मालमता कराची भरारी पथकाद्वारे रक्कम रु.३० लाख ४९ हजार ३०० इतकी वसुली करण्यात आली आहे व नागरी सुविधा केंद्रातील भरणा रक्कम रु.५६ लाख ९८ हजार २५३ इतकी आहे. अशा प्रकारे कर वसुली मोहिमेच्या २ दिवसांच्या कालावधीमध्ये एकूण २ कोटी ४१ लाख ८५ हजार २६४ इतकी रक्कम वसूल करण्यात आली आहे.

# मीडिया मॉनिटरिंग खासगी संस्थेकडे देण्याच्या सरकारच्या निर्णयाला तीव्र विरोध

**अक्षराज : वसंत रांधवण**
**दि.१३, अहिल्यानगर :** राज्य सरकारने वृत्तवाहिन्या, वृत्तपत्रे आणि डिजिटल माध्यमांवरील बातम्यांचे संकलन व विश्लेषण करण्याचे काम खासगी संस्थेला देण्याचा निर्णय घेतल्याने तसेच हा निर्णय पत्रकारितेच्या मूलभूत तत्त्वांना आणि लोकशाही मूल्यांना बाधा आणणारा असून, माध्यम स्वातंत्र्यावर गंभीर आघात करणारा असल्याचे मत महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष दत्ता गाडगे यांनी अहिल्यानगर येथे बोलताना व्यक्त केले.

दि.१२ मार्च रोजी सकाळी १२ वाजता पारनेर तहसील कार्यालयावर आणि दुपारी २ वाजता अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयामधे पत्रकारांसह जात त्यांना या संदर्भातील निवेदन देण्यात आले. पत्रकारितेचा मुख्य हेतू जनतेपर्यंत सत्य व वस्तुनिष्ठ माहिती पोहोचवणे हा आहे. मात्र, सरकारकडून या कामासाठी खासगी संस्था नेम



ण्याचा निर्णय घेतल्यामुळे बातम्यांवर अप्रत्यक्ष सेन्सॉरशिप लादली जाण्याचा धोका आहे. हा निर्णय सरकारविरोधी मतप्रवाह दडपण्याचा आणि प्रसारमाध्यमांवर आपला अंकुश ठेवण्याचा प्रयत्न असल्याचे दिसते. देशाच्या लोकशाही मूल्यांचे रक्षण करण्यासाठी आणि पत्रकारितेच्या स्वतंत्र भूमिकेचे संरक्षण करण्यासाठी आम्ही महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई,अहिल्यानगर जिल्ह्याचे वतीने सरकारच्या या निर्णयाला तीव्र विरोध करत असल्याचे सांगितले.सदर निवेदनामधे, सरकारने पारदर्शकता न ठेवता खासगी संस्थेला हे काम सोपवणे म्हणजे माध्यमांवर नियंत्रण ठेवण्याचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष प्रयत्न आहे. सरकार कडून लादली गेलेली ही अघोषित आणीबाणी त्वरित मागे घेण्यासंदर्भात आम्ही शासनास पत्राद्वारे कळवले होते. मात्र, आमच्या मागण्यांची दखल न घेतल्याने आज १२ मार्च रोजी महाराष्ट्राचे संवेदशील आणि अभिव्यक्ति स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते आणि राज्याचे माजी मुख्यमंत्री स्व.यशवंतराव चव्हाण यांच्या जयंती निमित्त महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ,मुंबई तर्फे राज्यव्यापी लेखणीबंद आंदोलन व निदर्शने करण्याचे ठरवले असून आपणास या निवेदनाद्वारे पुन्हा एकदा आमच्या मागण्या सरकार दरबारी ठेवण्यास अवगत करत आहोत.

पुढील ८ दिवसांत आमच्या मागण्या मान्य न झाल्यास आम्ही मंत्रालयाबाहेर लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलने करु असा इशारा देत आहोत. सदर बाब पुरोगामी महाराष्ट्रात घडू नये असे आम्हाला वाटते यासाठी आमच्या मागण्यांचा गांभीर्याने विचार करुन राज्य शासनाने खाजगी संस्थेमार्फत मीडिया मॉनिटरिंग करण्याचा घेतलेला निर्णय तत्काळ मागे घ्यावा अशी विनंती आहे अशा आशयाचे निवेदन देण्यात राज्यभरातील जिल्हाधिकारी, तहसिल कचेरीवर तसेच सरकारी कार्यालयामधे देण्यात आले आहे. याप्रसंगी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष दत्ता गाडगे, उपाध्यक्ष विनोद गायकवाड, तालुका सचिव संतोष कोरडे, सह सचिव ॲड. सोमनाथ गोपाळे, उपाध्यक्ष वसंत रांधवण, उपाध्यक्ष श्रीनिवास शिंदे, तालुका खजिनदार नितीन परंडवाल, महेश शिंगोटे आदींसह पत्रकार बांधव मोठ्या उपस्थित होते.

# कृषी विभागाच्या सर्व योजना सर्वसामान्य शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवा- आमदार काशिनाथ दाते

## गोपिनाथ मुंडे शेतकरी अपघात अनुदान योजनेच्या ३६ लाभार्थ्यांना ७१ लाखांचे अनुदान

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१३, पारनेर (अहिल्यानगर) :** कृषी विभागाच्या मार्फत विविध योजना शेतकऱ्यांसाठी राबवल्या जात असून सर्वसामान्य शेतकऱ्यांसाठी कृषी विभागामार्फत योग्य समुपदेशन करत या योजना राबविल्या पाहिजेत.

शेतकऱ्यांनी विविध योजना राबवत असताना कृषी विभागाशी संपर्क साधून सविस्तर माहिती घ्यावी या सर्व योजना ऑनलाइन राबवल्या जात असून लाभार्थ्यांनी कामाचा अध्यादेश आल्यानंतरच कामाला सुरुवात करून कामे मार्गे लावली जावीत यामुळे कुठलाही शेतकरी अनुदानापासून वंचित राहणार नाही असे मत आमदार काशिनाथ दाते सर यांनी व्यक्त केले आहे. गोपिनाथ मुंडे शेतकरी अपघात अनुदान योजनेच्या तालुक्यातील ३६ लाभार्थ्यांना ७१ लाखांचे अनुदान मंजुर झाले असून या योजनेचा धनादेश प्रमाणपत्र वितरण आमदार काशिनाथ दाते यांच्या हस्ते संपर्क कार्यालय येथे करण्यात आले याप्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रम प्रसंगी भाजपाचे तालुकाध्यक्ष राहुल पाटील शिंदे, खादी ग्रामोद्योग अध्यक्ष हसन राजे, उत्पन्न बाजार समितीचे संचालक शंकर नगरे, ॲड. युवराज पाटील, कृषी अधिकारी गजानन घुले, आदि मान्यवर यावेळी उपस्थित होते यावेळी पुढे बोलताना आ. दाते म्हणाले की, मी आमदार होण्यापूर्वी देखील मी सातत्याने या योजनेचा लाभ शेतकऱ्यांसाठी मिळावा यासाठी कृषी विभागाशी कायमच पाठपुरावा केला असून आमदार झाल्यानंतर कृषी विभागाची निगडित असलेले पहिले जे काम केले असेल तर ते अपघात ग्रस्त शेतकरी कुटुंबाला आर्थिक मदत मिळवण्यासाठी केले आहे. तालुक्यातील रस्ते अपघातात, विजेच्या धक्क्याने, पाण्यात बुडून मृत्यू पावलेल्या तसेच वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या अथवा जखमी झालेल्या ३६ कुटुंब सानुग्रह अनुदानापासून वंचित होते.

कुटुंबामध्ये जमीन जर आजोबाच्या नावावर असेल तर आणि त्या कुटुंबातील नातवाचे अपघाती निधन झाले तर त्या कुटुंबाला गोपीनाथ मुंडे अपघाती निधन योजनेचा लाभ मिळत नाही यासाठी या योजनेमध्ये धोरणात्मक बदल करणे आवश्यक असून यासंदर्भात कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्याशी चर्चा करून या योजनेचा महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना जास्तीत जास्त फायदा होईल या दृष्टीने प्रयत्न करणार आहे.

**-आमदार, काशिनाथ दाते**



उपमुख्यमंत्री अजित दादा पवार व कृषी मंत्री माणिकराव कोकाटे, यांच्याशी पत्रव्यवहार करत भेट घेऊन तात्काळ या कुटुंबांना मदत शासनामार्फत करावी अशी विनंती केली होती. या मागणीची दखल घेऊन संबंधित शेतकऱ्यांच्या लाभार्थ्यांच्या खात्यावरती ही रक्कम वर्ग करण्यात आली आहे. शेतकरी कुटुंबातील कर्ता माणूस गेल्यानंतर त्या कुटुंबातील व्यक्तींसाठी दोन लाख रुपये ही रक्कम पुरेशी नाही मात्र फुल ना फुलाची पाकळी म्हणून सरकारकडून त्या कुटुंबाला मदत म्हणून ही रक्कम दिली गेली आहे. या कुटुंबियांशी मी कायमच पाठीशी असल्याचे आमदार दाते यांनी सांगितले.

# पाडेगाव आंबेडकर सोसायटी लोकवस्ती मधील वराह पालन तात्काळ हटवा : वीर योद्धा प्रतिष्ठान

**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.१३, खंडाळा (सातारा) :** वीर योद्धा प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष बापूसाहेब ढावरे यांच्या नेतृत्वाखाली तसेच खंडाळा तालुका अध्यक्ष सलीम भाई शेख यांच्या अध्यक्षतेखाली पाडेगाव आंबेडकर सोसायटी येथे लोक वस्ती मधील जनतेच्या आरोग्यास हानिकारक वराह पालन तात्काळ हटवावे यासाठी वीर योद्धा प्रतिष्ठान खंडाळा तालुक्याच्या वतीने खंडाळा नायब तहसीलदार चेतन मोरे तसेच खंडाळा तालुका सहागटविकास अधिकारी मांढरे साहेब यांना नुकतेच निवेदन देण्यात आले.



पाडेगाव ता.खंडाळा येथील आंबेडकर सोसायटी मधील वराह (डुक्कर) पालन आरोग्यासाठी किती हानिकारक आहे त्याबद्दल वीर योद्धा प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष चांद भाई शेख यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की पाठीमागील पाच सहा वर्षांपासून आम्हाला या वराह पालनाचे मुळे कितीतरी आरोग्याच्या समस्या उद्भवत आहेत. आंबेडकर सोसायटीमध्ये सर्वत्र दुर्गंधी पसरलेले आहे.

सर्वत्र घाणीचे साम्राज्य आहे यामुळे आमच्या माय माऊली भगिनी वृद्ध लोक यांना याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे तसेच आमच्या इथून दुसरीकडे नांदायला गेलेल्या मुली परत आपल्या माहेरी येण्यासाठी धजावत नाहीत कारण ह्या घाणीच्या साम्राज्यामुळे दुर्गंधीमुळे पै.पाहुणे सुद्धा ह्या आंबेडकर सोसायटीमध्ये येत नाहीत तसेच कितीतरी लोक हे आंबेडकर सोसायटी सोडून दुसरीकडे राहायला गेलेले आहेत याचा प्रशासनाने विचार विनिमय करून लवकर तोडगा काढून आंबेडकर सोसायटी मधील वराह पालन तत्काल हटवावे. तसेच हे निवेदन सादर करताना पाडेगाव आंबेडकर सोसायटी मधील जनतेचा आक्रोश दिसून येत होता.

वीर योद्धा प्रतिष्ठानचे खंडाळा तालुका अध्यक्ष सलीम भाई शेख यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की लवकरात लवकर पाडेगाव आंबेडकर सोसायटी मधील वराह पालन तात्काळ न हटवल्यास आम्ही तीव्र स्वरूपाचे आंदोलन करू.

यावेळी स्वतः वीर योद्धा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष बहुजनांचे कैवारी सदैव जनतेसाठी तत्पर असणारे अमित उर्फ बापूसाहेब ढावरे स्वतः हजर होते. तसेच निवेदन देताना खंडाळा तालुक्यातील पदाधिकारी खंडाळा तालुका उपाध्यक्ष स्वप्निल जावळे, खंडाळा तालुका संघटक राहुल येळे, विशाल भोसले, पवन धायगुडे, पुरंदर तालुका उपाध्यक्ष नागेश बरकडे, सोनाजी बरकडे, प्रशांत बरकडे, दादासो अवघडे, देविदास वाघमारे, बिपिन मेनन, अनिकेत लवांडे, अनिकेत मोरे, सौरभ जाधव, जावेद शेख, कार्तिक बेंगळे, अमर अतार, बबलू सय्यद, आज्जो सय्यद, सरफराज मुल्ला, शकील शेख, शाहरुख सय्यद, मोसिन शेख, तसेच ईतर पदाधिकारी उपस्थित होते.

# लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाने 'सात सुत्री' कार्यक्रमाची अंमलबजावणी करावी : पालकमंत्री विखे

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१३, अहिल्यानगर :** शासनाच्या योजना जनतेपर्यंत पोहोचवण्याचे काम लोकप्रतिनिधी करत असतात. सर्व विभागांच्या योजनांची अंमलबजावणी प्रशासन उत्कृष्ट पद्धतीने करत आहे. लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाने योग्य समन्वय साधून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील सर्व अधिकाऱ्यांना १०० दिवस उद्दिष्टपूर्ती बाबत सात सुत्री कार्यक्रम दिला आहे. त्या अनुषंगाने अहिल्यानगर जिल्ह्यातील १२ तालुक्यातील सर्व विभाग प्रमुखांना जिल्हा प्रशासनाच्या वतीने सात सुत्री योजना तसेच प्रकल्पांची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे निर्देश जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी दिले. मंत्रालयातील सभागृह परिषद येथे अहिल्यानगर जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी यांच्याकडून प्राप्त निवेदनांच्या अनुषंगाने आयोजित बैठकीत श्री. विखे-पाटील बोलत होते.

यावेळी राहुरी मतदारसंघाचे आमदार शिवाजी कर्डिले, शेवगाव मतदारसंघाच्या आमदार मोनिका राजळे, पारनेर मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते, नेवासा मतदारसंघाचे आमदार विठ्ठल लंघे, संगमनेर मतदारसंघाचे आमदार अमोल खताळ, श्रीगोंदा मतदारसंघाचे आमदार विक्रम पाचपुते, अकोले मतदारसंघाचे आमदार डॉ. किरण लहामटे, अहिल्यानगर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, अहिल्यानगर महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे तर दूरदृश्य प्रणालीद्वारे पोलीस अधीक्षक राकेश ओला तसेच जिल्हा प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. जलसंपदा मंत्री श्री. विखे-पाटील म्हणाले की, जिल्हा परिषदेअंतर्गत तालुक्याच्या ठिकाणी काही आरोग्य उपकेंद्रांची कामे पूर्णत्वास येत आहेत.



अशा उपकेंद्रांची माहिती घेऊन ती हस्तांतरित करावीत. तसेच नवीन प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या उभारणीसाठी शासनाकडे प्रस्ताव सादर करावेत. जलजीवन मिशन अंतर्गत योजनांचा आढावा घ्यावा. पिण्याच्या पाण्याच्या टँकरची मागणी वाढत आहे याबाबत जिल्हा प्रशासनाने बैठकीतचे आयोजन करून टँकरचे नियोजन करावे. अहिल्यानगर जिल्ह्यातील महसूल, ग्राम विकास, नगरविकास, कृषी, सार्वजनिक आरोग्य, क्रीडा, सार्वजनिक बांधकाम, जलसंधारण आदी विभागांच्या वतीने सुरू असलेल्या कामांचा आढावा यावेळी घेण्यात आला.

# कळंब तालुक्यातील पडझड झालेल्या नागरिकांना तात्काळ नुकसान भरपाई वाटप करा-कॉ. ताटे

**अक्षराज : अशोक कुलकर्णी**

**दि.१२, कळंब :** कळंब तालुक्यात गेल्या वर्षी दि.२८ मार्च व २५ मे २०२४ मध्ये हवामान बदलामुळे झालेल्या वादळी वाऱ्यामुळे कळंब तालुक्यातील नायगाव, खामसवाडी, येरमाळा या भागात चक्रीवादळ व पावसामुळे अनेक नागरिकांच्या घराचे नुकसान झाले होते. त्यामुळे संबंधित लाभधारकांनी तलाठी व तहसील कार्यालयाकडे अनुदान मिळण्यासाठी पंचनामे करून अनुदानाची मागणी करण्यात आली होती.परंतु जवळपास एक वर्षाचा कालावधी लोटून सुद्धा अद्यापही लाभधारकांच्या खात्यात सदरील रक्कम जमा न झाल्यामुळे श्रमिक मानवाधिकार संघाच्या वतीने संस्थापक अध्यक्ष भाई बजरंग ताटे यांच्या नेतृत्वाखाली दि.१२ मार्च २०२५ रोजी निवेदन देऊन मागणी करण्यात आली आहे. दिलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की, हवामान बदलामुळे वादळी वारे व पावसामुळे पडझड झालेल्या नागरिकांनी तलाठी व तहसिलदार यांना नुकसान भरपाई मिळावी म्हणून मागणी केली होती.त्या मागणीनुसार व नैसर्गिक आपत्ती विभागाच्या दि.१५ ऑक्टोबर २०२४ रोजी च्या पत्रानुसार कळंब तालुक्यातील खामसवाडी येरमाळा व नायगाव येथील नागरीकांना प्रत्येक ४ हजार रुपये प्रमाणे ८० हजार रुपये मंजूर झाले आहेत. परंतु सदरील नुकसान भरपाई हे गेल्या चार महिन्यापासून वाटपाच्या प्रतीक्षेत आहे. त्यामुळे सदरील घटनेला जवळपास ११ महिन्याचा कालावधी लोटून गेला असून सुद्धा नैसर्गिक आपत्ती विभाग तहसील कार्यालय याकडे डोळेझाक करत आहे तर मौजे नायगाव, खामसवाडी, येरमाळा या गावच्या तलाठी, ग्राम महसूल अधिकारी यांनी कर्तव्य व कामात कसूर केल्यामुळे तालुक्यातील २० लाभार्थ्यांना प्रत्येकी ४ हजार रुपये असे एकूण ८० हजार रुपये वाटप केले नसल्याने ते तात्काळ सदरील लाभधारकांना वाटप करण्यात यावे अन्यथा वाटप न केल्यास तहसील कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येईल असा इशारा निवेदनात देण्यात आला आहे. सदरील निवेदनावर श्रमिक मानवाधिकार संघाचे संस्थापक अध्यक्ष भाई बजरंग ताटे, मानव अधिकार आंदोलनचे हनुमंत पाटुळे, सौ. माया शिंदे, राजेंद्र कसबे, दिलीप खलसे मोहन कसबे जुलैखा शेख यांच्या स्वाक्षरी आहेत.

# थोडक्यात

## सरपंच पद ६३४ गावांत खुल्या प्रवर्गासाठी ३३० ठिकाणी ओबीसी, ११९ ठिकाणी अनुसूचित जमाती तर दीडशे ठिकाणी अनुसूचित जातींना आरक्षण

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१३, अहिल्यानगर :** २०२५ ते ३०३० या पाच वर्षाच्या कालावधीत नगर जिल्ह्यातील बिगर अनुसूचित क्षेत्रातील १ हजार २२३ ग्रामपंचायतींपैकी ६२४ ठिकाणी खुल्या प्रवर्गातील उमेदवारांना सरपंच होण्याची संधी मिळणार आहे. यात ३१२ ठिकाणी महिलांचा समावेश असणार आहे. यासह ३३० ठिकाणी ओबीसी प्रवर्गातील व्यक्तींसाठी सरपंच पदाचे आरक्षण राहणार असून यात १६५ महिलांना संधी मिळणार आहे. तर ११९ ठिकाणी अनुसूचित जमातीसाठी आरक्षण राहणार असून यात ६० ठिकाणी महिला, तसेच दीडशे ठिकाणी अनुसूचित जाती प्रवर्गासाठी आरक्षण राहणार असून यात ७५ महिला सरपंच यांचा समावेश राहणार आहे. अहिल्यानगरसह राज्यातील २०२५ ते २०३० या पाच वर्षाच्या कालावधीत सरपंच पदाचे आरक्षण सरकारच्या वतीने निश्चित करण्यात आले आहे. याबाबतचे आदेश महाराष्ट्र शासन राजपत्र याममध्ये ५ मार्च रोजी प्रसिद्ध करण्यात आले आहे. यात राज्यात अनुसूचित जातीसाठी ३२५८ , अनुसूचित जमातीसाठी १८४३, ओबीसीसाठी ६११५ आणि सर्वसाधारण प्रवर्गासाठी १३ हजार ५८६ ठिकाणी सरपंच पद सर्वसाधारण प्रवर्गासाठी राहणार आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात बिगर अनुसूचित क्षेत्रातील १२२३ ग्रामपंचायतमध्ये १५० ठिकाणी अनुसूचित जातीसाठी सरपंच पद आरक्षित राहणार असून यात ७५ महिलांचा समावेश राहणार आहे. ११९ ठिकाणी सरपंच पद अनुसूचित जमातीसाठी आरक्षित राहणार असून यात ६० महिलांचा समावेश राहणार आहे. ओबीसी प्रवर्गासाठी ३३० ठिकाणी सरपंच पद आरक्षित राहणार असून यात १६५ महिलांचा समावेश असणार आहे तर ६२४ ठिकाणी सरपंच पद हे खुल्या प्रवर्गासाठी राहणार असून यात ३१२ खुल्या प्रवर्गातील महिला सरपंच यांचा समावेश राहणार आहे.

## शिक्षक क्षमता वृद्धी प्रशिक्षण सुरळीत सुरू

**अक्षराज : प्रभाकर हजारे**

**दि.१३, मुंबई :** प्रादेशिक विद्या प्राधिकरण मुंबई आणि बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मनपाच्या प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांचे जी/दक्षिण विभागातील केशवराव खाड्ये मार्ग शाळेत प्रशिक्षण चालू आहे. २.० हे प्रशिक्षण सुरळीत आणि शिस्तबद्ध पध्दतीने चालू असल्याचे आमचे प्रतिनिधी प्रभाकर हजारे यांनी सांगितले.

याबाबत सविस्तर माहिती अशी की राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार राज्य शैक्षणिक आराखडा पायाभूत व शालेय स्तर क्षमता आधारीत अध्ययन व अध्ययन प्रक्रिया,क्षमता आधारीत मूल्यांकन संकल्पना,समग्र प्रगतीपत्रक,विचारप्रवर्तक प्रश्न,शाळा गुणवत्ता मूल्यांकन,आणि आश्वासन आराखडा अशा जवळपास पंधरा घटकांचा समावेश असलेले हे प्रशिक्षण शिक्षकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात सुरू आहे.

आतापर्यंत शिक्षकांच्या तीन बॅच पूर्ण झाल्या असून साडेपाचशे शिक्षकांनी प्रशिक्षण घेतले आहे.शेवटच्या आणि चौथ्या बॅचमध्ये एकूण २५० शिक्षकांना हे प्रशिक्षण देण्यात येत आहे.या प्रशिक्षणासाठी जी/दक्षिण विभाग आणि जी/ उत्तर या दोन्ही विभागातील सर्व माध्यमाच्या शिक्षकांची उपस्थिती आहे.एकूण आठशे शिक्षकांना प्रशिक्षित केले जात आहे. प्रशिक्षण पूर्ण केलेल्या शिक्षकांना युआरसी तर्फे प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात येत आहे.

युआरसी - ११ चे समन्वयक सुदाम फरडे यांच्या उत्तम नियोजनाखाली व जी /दक्षिण विभागाच्या प्रशासकीय अधिकारी वर्षा गांगुर्डे यांच्या मार्गदर्शनाखाली हे प्रशिक्षण देण्यात येत आहे. प्रशि.अरविंद पवार,लिना देसाई,महेश लोणारे,प्रशांत पाटील,दिलीप खांडरे,अच्युत सर,सना सोहेल,जयश्री दडस हे तज्ञ मार्गदर्शक म्हणून प्रशिक्षणार्थी शिक्षकांना उत्तम प्रकारे प्रशिक्षण देत आहेत.तज्ञ मार्गदर्शक महेश लोणारे आपल्या सुमधुर बासरी वादनाने प्रशिक्षणार्थींना खिळवून ठेवत आहेत. तर अरविंद पवार आपल्या स्वलिखित कविता आणि वेगवेगळ्या गीतांच्या माध्यमातून प्रशिक्षण देत आहेत.

प्रशिक्षण सुरळीत पार पाडण्यासाठी केशवराव खाड्ये मार्ग शाळेच्या मुख्याध्यापक प्रमिला सिंग आणि त्यांचे सर्व सहकारी यांनी परिश्रम घेत आहेत.

## पंढरीतील कॅरीडोर प्रकरणी नागरिकांमध्ये गैरसमज पसरवू नये - आ.आवताडे

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.१३, पंढरपूर :** पंढरपूर शहराच्या विकासासाठी सरकारने कॅरीडॉर राबविण्याचा विचार पक्का केला आहे. मात्र यासाठी पंढरपूर येथील नागरिकांची मते आजमावणे हे माझे पहिले कर्तव्य आहे. त्यासाठी आपण ही बैठक आयोजित केली आहे. त्यामुळे शासन दरबारी नेमकी माझी भूमिका काय असावी.ही दाखविण्याची आल्यास आपण चुकीच्या पद्धतीने काम व कोणावर अन्याय होत असेल तर मी आमदार म्हणून नागरिकांच्या पाठीशीच उभा राहील. असे आश्वासन आमदार समाधान आवताडे यांनी दिले आहे.

पंढरपूर येथिल कॅरीडॉर बाबत नागरिकांची मते जाणून घेण्यासाठी पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांनी शासकीय विश्राम येथे गुरुवारी बैठक बोलावली होती. या बैठकीला पंढरपूर शहर आणि श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसरातील रहिवासी नागरिक आणि व्यापारी यांना निमंत्रित केले होते. गेल्या काही वर्षांपासून पंढरपूर कॅरीडॉर विषय चर्चेत असून मंदिर परिसरातील बाधित लोकांनी विरोध दर्शवला होता .तर पंढरपुरातील काहीजण कॅरीडॉरचे समर्थन देखील करत आहेत. यावर या बैठकीत साधक बाधक चर्चा झाली.

नागरिक आणि व्यापाऱ्यांनी आपापली मते या बैठकीत नोंदवली. त्यानंतर आमदार समाधान आवताडे यांनी कॅरीडॉर बाबत प्रशासनाकडून अजून कोणताही आराखडा आलेला नाही. परंतु सभागृहात जर हा विषय चर्चेला आला तर लोकांचे मत काय आहे हे लोकप्रतिनिधी म्हणून मला माहित असावे यासाठी ही बैठक घेतली असून जे इथल्या लोकांचे मत आहे तेच माझे देखील मत आहे. परंतु कॅरीडॉरला विरोध आहे असा याचा अर्थ नाही. तर ते करताना कोणालाही त्रास होणार नाही अशा पद्धतीने करणे गरजेचे आहे. असे सांगितले आहे. त्याचबरोबर पंढरपूरकरांचा कॅरीडॉरला विरोध आहे असे माध्यमांनी म्हणू नये . केवळ काहीं भागांतील नुकसान होत असल्याने त्या भागाचा योग्य विचार करू.मात्र याचा सर्व अर्थ येथील कॅरीडोर प्रकल्पालाच पूर्णतः विरोध असल्याचे बसवू नये.असेही आ.समाधान आवताडे सुचवले आहे. विकासात्मक गोष्टीला विरोध न करण्याचेही आव्हान यावेळी आमदार समाधान आवताडे यांनी केले.